महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक—४२२००३
सर्व्हे नं. १५६०/१ आडगाव शिवार, समाजकल्याण वसतीगृहाशेजारी,
आडगाव, ता. जि. नाशिक
Email ID - nsksec@rediffmail.com Website - sscboardnashik.com

क्र./नाविमं/प्रमाणपत्र/०१...
नाशिक — ४२२००३
दिनांक — ०३/०४/२०२६

प्रती,

मुख्याध्यापक./प्राचार्य,
मंडळ मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा नाशिक/धुळे/जळगाव/नंदूरबार

विषय—माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेचे व्दितीय गुणपत्रक/प्रमाणपत्र, तात्पुरते प्रमाणपत्र व स्थलांतर प्रमाणपत्र RFP प्रक्रीयेव्दारे ऑनलाईन प्रणालीमधून देणेबाबत.

संदर्भ—राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा—३/१३०९ दिनांक २४/०३/२०२६ रोजी चे पत्र

उपरोक्त विषय व संदर्भान्वये नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मंडळ मान्यता माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, संदर्भिय पत्राची नोंद घेऊन त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. सदर माहिती आपल्या सूचना फलकावर लावून सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेचे व्दितीय गुणपत्रक/प्रमाणपत्र, (Duplicate Marksheet / Certificate) तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) RFP प्रक्रीयेव्दारे अर्ज करण्यास ऑनलाईन प्रणालीमधून मंडळाच्या संकेतस्थळावर **WWW.mahahsscboard.in** दिनांक १९/११/२०२५ पासून सुरू करण्यात आले आहे.

१) व्दितीय गुणपत्रक/प्रमाणपत्र (Duplicate Marksheet / Certificate) तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र ( (Migration Certificate) यासाठी यापूर्वीचे सर्व प्रकारचे शुल्क रद्द करण्यात आले आहे. व्दितीय गुणपत्रक/प्रमाणपत्र, (Duplicate Marksheet/Certificate) तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) प्रती प्रमाणपत्र रूपये ५००/—(रूपये पाचशे फक्त) शुल्क आकारण्यात येईल (कोणत्याही प्रतीसाठी) मागणी अर्जासाठी स्वतंत्र शुल्क आकारण्यात येणार नाही.

२)माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२वी)विद्यार्थ्यांना व शाळा /कनिष्ठ महाविद्यालय यांना मोबाईल फोन नंबर व ई मेल, ओटीपी च्या आधारे व्दितीय गुणपत्रक/प्रमाणपत्र (Duplicate Marksheet / Certificate) तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) स्थलांतर प्रमाणपत्रासाठी (Migration Certificate) अर्ज करता येईल. अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यासंबंधीची कार्यवाही नियमित अर्जासाठीचे कामकाजाचे ०७ दिवसात व तात्काळसाठी ०३ दिवसात तयार करण्यात येईल.

३)गुणपत्रक / प्रमाणपत्र (Duplicate Marksheet / Certificate) मागणी पोस्टाने केल्यास ते स्पिड पोस्टाने पाठविण्यात येईल.

४)प्रचलित पध्दतीमध्ये व्दितीय प्रमाणपत्रावर (Duplicate Certificate) संबंधित माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा / शिक्का / मुख्याध्यापक / प्राचार्य यांची स्वाक्षरी घेण्यात येत होती. आता स्वाक्षरी घेण्याची आवश्यकता नाही.

५) सध्यस्थितीत ऑनलाईन प्रणाली मध्ये शाळा / कनिष्ठ महाविलयांचे शिफारस पत्राची अवश्यकता नाही. सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी शिफारस पत्र न देता अर्जदारास ऑनलाईन अर्ज करण्याबाबत मार्गदर्शन करावे.

६)ऑनलाईन प्रणालीत एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

७) विद्यार्थ्याने स्वत लॉगीन करून आपल्या अर्जाची सध्यस्थिती मंडळाच्या वेबसाईटवर तपासून पहावी.

८) अर्जदारांच्या अडचणीबाबत लॉगीन स्क्रीनवर हेल्प डेस्क न (९०२८९४७८८३) दिलेल्या नंबर वर संपर्क करावा.

(डॉ. मच्छींद्र कदम)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — ४२२००३

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षांचे व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र / स्थलांतर प्रमाणपत्र/ तात्पुरते प्रमाणपत्र मिळविण्यासाठी विद्यार्थी /पालक यांनी सादर करावयाचे

# प्रतिज्ञापत्र (Affidavit)

टीप

१. विद्यार्थी सज्ञान नसल्यास (वय १८ वर्षापेक्षा कमी असल्यास) सदरचे प्रतिज्ञापत्र पालकांनी भरुन द्यावयाचे आहे
२. महिला अर्जदारांकरीता त्यांचे आधारकार्ड वरील व गुणपत्रक/ प्रमाणपत्रावरील नाव हे वेगवेगळे असल्यास प्रतिज्ञापत्रात दोन्ही नावे दर्शविण्यात यावीत

विद्यार्थी/पालक अर्जदाराचे पूर्ण नाव श्री/श्रीमती (संपूर्ण नाव) ------------------------------------------------

पाल्याचे नाव कुमार/कुमारीका ------------------------------------------------

**विद्यार्थीनीचे नाव (नावात बदल असल्यास लिहावे)**

(गुणपत्रक/प्रमाणपत्रावरील) ------------------------------------------------

(आधारकार्डवरील) ------------------------------------------------

बैठक क्रमांक -------------- परीक्षा वर्ष -------------- इ.१० वी / इ.१२ वी -------------

विद्यार्थी/ विद्यार्थीनीचे वय -------------व्यवसाय ------------- राहणार -------------
(पिनकोडसह पत्ता)

पोस्ट ------------ तालुका ------------ जिल्हा -------------

असे प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, मी अर्जात नमूद केलेला बैठक क्रमांक माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा असून माझे/ माझ्या पाल्याचे व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र / स्थलांतर प्रमाणपत्र/ तात्पुरते प्रमाणपत्र हे गहाळ झालेले असल्याने त्याची व्दितीय प्रत मिळण्यासाठी सदरचे प्रतिज्ञापत्र लिहून देत आहे.

सदरच्या व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र / स्थलांतर प्रमाणपत्र/ तात्पुरते प्रमाणपत्र याचा इतर कोणत्याही कारणासाठी मी गैरवापर करणार नाही.

तसेच मला मिळालेले व गहाळ झालेले मूळ गुणपत्रक / प्रमाणपत्र / स्थलांतर प्रमाणपत्र/ तात्पुरते प्रमाणपत्र सापडल्यास ते कार्यालयास परत करीन मात्र त्यासाठी भरलेले शुल्क परत मागणार नाही.

वर उल्लेख केलेली माहिती खरी असून सदरची माहिती खोटी आढळून आल्यास दंड संहिता कलम १९९/२००/१९३ (२) मधील तरतुदीनुसार किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर कारवाई केली जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक | स्वाक्षरी अर्जदार/पालक/विद्यार्थी

ठिकाण (स्थळ)......... | नाव ------------------------

प्रतिज्ञापत्र करणाऱ्याचे नाव